# आरोग्य विभाग, जिल्हा परिषद ठाणे

जा.क्र.जिप/आवि/सी८/वशी/ ४० /२०
आरोग्य विभाग, जिल्हा परिषद ठाणे
दिनांक:- १५ /०१/२०२०

प्रति,

जनरल मॅनेजर
पोदार इंटरनॅशनल स्कुल,
कोलशेत व्हीलेज, हिरानंदानी इस्टेट,
घोडबंदर रोड, ठाणे (प) ४००६०७

**विषय** : ठाणे महानगर पालीका कार्यक्षेत्रातील घोडबंदर रोड येथील हिरानंदानी इस्टेट मधील पोदार इंटरनॅशनल या शाळेमध्ये तळमजला ते पाचवा मजल्यावर पोदार एज्युकेशन ट्रस्ट संचलित पोदार इंटरनॅशनल स्कुल इंग्रजी माध्यम या शाळेसाठी आरोग्य विषयक नाहरकत दाखला.

**संदर्भ** : १) आपला दिनांक ०८/०१/२०२० चा अर्ज.
२) या कार्यालयाचे पत्र क्रंजिप/आवि/सी-८/वशी/४१६/१७
दिनांक - २०/०६/२०१७

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते कीं, आपण विनंती केल्याप्रमाणे व संदर्भ क्रं. २ अन्वये ठाणे महानगर पालीका कार्यक्षेत्रातील घोडबंदर रोड येथील हिरानंदानी इस्टेट मधील पोदार इंटरनॅशनल या शाळेमध्ये तळमजला ते पाचवा मजल्यावर पोदार एज्युकेशन ट्रस्ट संचलित **पोदार इंटरनॅशनल स्कुल इंग्रजी माध्यम** या शाळेच्या इमारतीसाठी खालील शर्तीना अधिन राहून आरोग्य दृष्टीकोनातून हरकत नाही.

१) कार्यरत शाळेसाठी शुध्द व सुरक्षित पाणी पुरवठा सातत्याने उपलब्ध ठेवणे, पाणी साठवण टाक्याच्या नियमित स्वच्छता राखणे याबाबत व्यवस्थापनाने कायम स्वरुपी व्यवस्था ठेवावी.
२) कार्यरत शाळेच्या सॅनिटरी व वायुविजन तसेच सांडपाणी व्यवस्थेची सातत्याने देखभाल करुन ती देखभाल नेहमी सुस्थीतीत राहील यांची व्यवस्थापनाने खबरदारी घ्यावी.
३) कार्यरत शाळेच्या प्रसाधनगृहाची स्वच्छता व दैनदिंन परिसर स्वच्छतेसाठी सफाई कामगार कायमस्वरुपी नियुक्त करावे.
४) कार्यरत शाळेमध्ये काम करणा-या नोकरवर्ग व शिक्षकवर्गाची दर सहा महिन्यांनी वैद्यकिय तपासणी करणे व्यवस्थापनास बंधनकारक राहील.
५) कार्यरत शाळेमध्ये अग्निशमन यंत्रणा व प्रथमोपचार किट नियमित कार्यान्वित ठेवावी.
६) दर तिन महिन्यांनी पाणी साठवणुक टाकी व प्रत्यक्ष पिण्यासाठी वापरण्यात येणा-या पिण्याच्या पाण्याचा नमुना तपासणी करुन दुषीत आढळल्यास योग्य ती कार्यवाही करावी.
७) सार्वजनिक आरोग्याच्या हिताच्या दृष्टिने या कार्यालयाकडून वेळोवेळी दिल्या जाणा-या सुचनांचे, आदेशाचे पालन करण्याचे बंधन व्यवस्थापनावर राहील.

सदर दाखला दिं.३१/१२/२०२० पर्यंत अंमलात राहील. नंतर दरवर्षी नाहकरत दाखला घेण्याचे व्यवस्थापनावर बंधनकारक राहील.

HEALTH DEPARTMENT
THANE
ZILLA PARISHAD

जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा परिषद ठाणे

Scanned by CamScanner